बीएसई वेबसाइट - गुंतवणूकदार शिक्षण विभाग - गुंतवणूकदार मंच

# सोशल मीडियावर एज्युकेटर, ट्यूटर, सल्लागाराच्या नावाखाली गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या कृत्यांबाबत खबरदारी

सोशल मीडिया जितका जास्त 'सोशल' आहे तितकाच आपण त्याला अँटी सोशल (समाजविघातक) सुद्धा म्हणू शकतो किंवा तो एखाद्यास त्या मार्गावर जाण्यास प्रवृत्त करू शकतो. या मार्गावर, सार्वजनिक-प्रत्येकजण स्वत:ला वापरकर्ता म्हणून ओळखतो आणि समजतो, परंतु काही कटू अनुभवांनंतर त्यांचा वापर (गैरवापर) होत असल्याचे त्यांना जाणवते. विशेषत: गुंतवणुकीसाठी शेअर खरेदी-विक्री किंवा खरेदी-विक्रीच्या नावाखाली आणि विविध मार्गांनी गुंतवणुकीचे सल्ले देऊन गेल्या काही काळापासून लोकांना मूर्ख बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. इतकं असूनही तेच लोक यात अडकले आहेत, जे लोभी आहेत. परंतु त्यांना फसवणारे त्यांच्यापेक्षा जास्त हुशार आहेत, जे अशा लोकांना लुटून लखपती आणि करोडपती बनले आहेत.

अलीकडे, नियामक संस्था सेबीने एक असे विचित्र प्रकरण पकडले आहे, जे धक्कादायक तर आहेच, परंतु गुंतवणूकदार वर्गासाठी हा एक मोठा धडा मानला जाऊ शकतो. सेबीच्या निदर्शनास आले आहे की काही व्यक्ती गुंतवणूकदारांना दरमहा तीन लाख ते सहा लाखांच्या कमाईची हमी देतात, त्यांना ते स्टॉकची शिफारस करतात, त्यांना ते थेट व्यापाराच्या वेळेतही खरेदी-विक्रीचा सल्ला देतात. गंमतीची बाब ही आहे की असे सल्लागार रोखे-स्टॉक मार्केट शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या नावाखाली लोकांना आमिष दाखवतात किंवा आकर्षित करतात आणि शिक्षणाच्या नावाखाली गुंतवणूकदारांची शिकार करतात. पाहायला गेल्यास हे सामान्य वाटेल, पण गुंतवणूकदार-व्यापाऱ्यांना आकर्षित करणाऱ्या, उच्च परताव्याची हमी देणाऱ्या आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून गुंतवणूक शिक्षणाच्या नावाखाली लोकांची दिशाभूल करणाऱ्या काही भागधारकांवर आणि कथित गुंतवणूक सल्लागार-विश्लेषकांवर सेबीने कारवाई सुरू केली आहे. यातील काही स्वत:ला तज्ञ म्हणवतात, तर अनेक जण स्वत:ला ‘चार्ट का बाप’ म्हणतात. येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की स्टॉक मार्केट मध्ये चार्टवर विश्वास ठेवणाऱ्यांची संख्या देखील मोठी आहे.

## खाजगी समूहाच्या नावाने सापळा

INTERNAL

हे लोक शेअर बाजारातील हालचालींची सखोल माहिती असल्याचा दावा करतात आणि गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे काही वेळात दुप्पट करण्याची ऑफर देतात. हे गुंतवणूक सल्लागार सेबीकडे नोंदणीकृत नसतात, तर ते खाजगी समूह म्हणून काम करतात. जे धूर्त शब्दांत गुंतवणूकदारांना आमिष दाखवून आपल्या जाळ्यात अडकवतात. अर्थात, लोभी लोकांचे ढीग त्यांनाही सापडतात. ही म्हण सर्वश्रुत आहे की, असतील शिते तर जमतील भुते. म्हणजेच जिथे फायदा किंवा लोभ आहे तिथे लोक जमा होणारच. परंतु या प्रकरणात, फसवणारा व्यक्ती लखपती-करोडपती होतो. सेबी जरी नियामक यंत्रणा म्हणून आपले काम करत असली तरी गुंतवणूकदार जर जागरूक झाले नाहीत आणि समजून न घेता अशा आमिषांना बळी पडत राहिले तर त्यांची परिस्थिती आणखी बिकट होईल हे निश्चितच आहे. सेबीने अलीकडेच अशा काही सहभागींकडून त्यांची 17 कोटी रुपयांची कमाई जप्त करून वेगळ्या खात्यात जमा केली आहे. काहींना रोखे बाजारात व्यापार करण्यापासून रोखण्यात आले आहे, म्हणजे त्यांना बाजारात व्यापार करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

## एज्युकेटर, ट्यूटर नंतर बनतात लुटर

वस्तुस्थिती अशी आहे की सोशल मीडियाद्वारे आर्थिक सल्ला देणाऱ्या इन्फ्लुएंसर्सचे गेल्या दोन-तीन वर्षांत चांगलेच बिंग फुटले आहे. हे इन्फ्लुएंसर्स स्टॉक्सपासून फंड्स किंवा इतर गुंतवणुकीच्या साधनांपर्यंतच्या योजनांबद्दल आपल्या वाक्चातुर्याने लोकांना भुरळ घालतात, ज्यात मुख्यत: अनेक छोटे गुंतवणूकदार अडकले जातात. या वर्गाला आळा घालण्यासाठी सेबीने नियमावली आणण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, मात्र तोपर्यंत लोकांची फसवणूक सुरूच राहणार आहे. समाजमाध्यमांवरील अशा नियोजित-तथाकथित प्रभावशाली लोकांच्या सल्ल्यांपासून बचतकर्ता-गुंतवणूकदार वर्ग सजग राहिला नाही तर कमाई तर सोडाच, लूटमारीची वेळ येईल. असे प्रभावशाली इन्फ्लुएंसर्स स्टॉक किंवा फंडांसाठी बोलण्याचा स्वतंत्र व्यवसाय करतात, ज्यामध्ये ते संबंधित स्टॉक किंवा/आणि गुंतवणूकदारांना आकर्षित करणाऱ्या आणि त्यांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करणाऱ्या निधीच्या योजनांबद्दल सोशल मीडियावर माहिती, सादरीकरणे, टिप्पणी, व्हिडिओ इत्यादीचा प्रचार-प्रसार करून व्हायरल करतात. हे लोक स्वतःला एज्युकेटर, कॉंटेंट क्रिएटर आणि ट्यूटर म्हणून स्वत:ची ओळख सांगतात. यांना पाहणारे आणि ऐकणारे लाखो लोक प्रभावित होतात आणि गुंतवणूक करतात. किंबहुना यांपैकी बहुतेक गोष्टी या पूर्वनियोजित असतात. सेबीचे असे मत आहे की ज्या व्यक्ती गुंतवणूकदारांची दिशाभूल करण्यासाठी आणि त्यांना गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करतात, अशा व्यक्तींवर अंकुश ठेवण्याची गरज आहे.

INTERNAL

परदेशातही असे कारनामे होतात

सोशल मीडियावरील ही इन्फ्लुएंसर्सची समस्या केवळ भारतातच नाही तर विकसित आणि विकसनशील देशांमध्येही आहे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे सोपे नाही. ऑस्ट्रेलियन सिक्युरिटीज अँड इन्व्हेस्टमेंट कमिशनने मार्च 2022 मध्ये जाहीर केले की सोशल मीडिया इन्फ्लुएंसर्सकडे आर्थिक सल्ला देण्यासाठी परवाना असणे आवश्यक आहे आणि उल्लंघन करणाऱ्यांना तुरुंगवास किंवा आर्थिक दंड भोगावा लागतो. सिक्युरिटीज कायदा तज्ज्ञांच्या मते, सेबीसाठी हे काम फार कठीण आहे. कारण या इन्फ्लुएंसर वर्गांचे नियमन होत नाही. याऐवजी सेबी त्याच्या नियमन केलेल्या वर्गाला अशा लोकांपासून दूर राहण्यास भाग पाडू शकते. अर्थात, हा विषय सेबीसाठी सुद्धा एक आव्हानच आहे, निदान सेबीच्या या कारवाईमुळे अशा भागधारकांमध्ये भीती निर्माण होऊ शकते, परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे गुंतवणूकदारांनी स्वत: अधिक सतर्क असले पाहिजे.

सादरकर्ते- जयेश चितलिया

(टीप: हे विचार आणि अभिप्राय लेखकाची आहेत, ज्याचा हेतु गुंतवणूकदारांच्या माहितीसाठी आणि त्यांना जागरूक करण आहे, त्यात कोणतीही त्रुटी किंवा चुक असेल तर बीएसई त्यास जबाबदार नाही)

INTERNAL